**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*



| | | | |
|---|---|---|---|
| 262 | भारतातील तापमान बदल : एक भौगोलिक अभ्यास | डॉ. अर्जुन केशवराव कटके | 1168-1175 |
| 263 | हरित राजकारण आणि भारत | प्रा. विठ्ठल दहिफळे | 1176-1181 |
| 264 | चिरंतर शाश्वत विकास आणि शासनाचे धोरण | अशोक अर्जुनराव चव्हाण,<br>डॉ. पांडुरंग एम. कल्याणकर | 1182-1184 |
| 265 | मुंबई उपनगरातील अनाथ मुलांना दत्तक घेण्याची कारणे | प्रो.डॉ.पी.पी.लोखंडे,<br>मोहिनी नारायणराव नाब्दे | 1185-1188 |
| 266 | शाश्वत विकासासाठी लिंग समातनेची आवश्यकता | प्रा. शितल रूद्रमुनी येरूळे | 1189-1190 |
| 267 | **पनवेल शहरातील झोपडपट्टीतील कुटुंबांचे अध्ययन** | **डॉ. अजय कमलाकर दिक्षित,<br>डॉ. बाळासाहेब साहेबराव पाटील** | 1191-1198 |
| 268 | पाणी व स्वच्छता : एक भौगोलिक अभ्यास | प्रा.डॉ. डी.एस. इटले | 1199-1203 |
| 269 | पर्यावरण संरक्षण व व्यवस्थापनात महिलांची भुमिका | प्रा. संतोष बाबुराव कुन्हे | 1204-1206 |
| 270 | गुणवत्ता पुर्ण शिक्षण | सोमनाथ मुरलीधर चोभे<br>डॉ. ए. आर. वागडव. | 1207-1210 |
| 271 | भारतातील दारिद्रय निर्मूलनातील प्रशासनाची भुमिका | डॉ. डी.एस.शिंदे | 1211-1214 |
| 272 | सुशाशन शाश्वत विकासाची गुरूकिल्ली | प्रा.डॉ. दत्ता जाधव | 1215-1216 |
| 273 | भारतातील दारिद्रय निमूर्लनाचे उपाय | प्रा. डॉ. गोरे . बी. एम. | 1217-1219 |
| 274 | दारिद्रय निर्मुलन | मनीषा तुकाराम खंडाळे | 1220-1223 |
| 275 | **शाश्वत विकासासाठी कृषिसंस्कृती बोलीभाषांचे जतन** | **प्रा.डॉ. दत्तात्रय प्रभाकर डुंबरे** | 1224-1229 |
| 276 | शाश्वत विकास आणि दारिद्रय निर्मूलन | अलका वा. पाटील | 1230-1233 |
| 277 | गुणवत्तापूर्ण शिक्षण | प्रा.अशोक रामचंद्र गोरे | 1234-1236 |
| 278 | शाश्वत आर्थिक विकास व दारिद्रय निर्मूलन | डॉ.प्रमोद बालाजीराव बेरळीकर | 1237-1240 |
| 279 | भारतातील स्त्री—पुरूष विषमतेची कारणे व उपाय | प्रा. डॉ. चावरे एम. व्ही. | 1241-1243 |
| 280 | **विकसनशिल भारतासाठी बहुजनांच्या शिक्षणाची गरज** | **प्रा.डॉ.देशमुख रुपेश** | 1244-1247 |
| 281 | स्त्री भ्रूण हत्या : एक ज्वलंत प्रश्न | प्रा.डॉ. श्रीकांत गायकवाड | 1248-1251 |
| 282 | उच्च शिक्षण आणि गुणवत्ता वास्तव चित्र | प्रा. डॉ. संदिपान गायके | 1252-1254 |
| 283 | **लिंग समानता** | **सहा.प्रा.इनकर विक्रम सोनाजी** | 1255-1261 |
| 284 | शेतीचा शाश्वत विकास | काळे गोविंद रामराव,<br>प्रा.डॉ. दिपक भारती | 1262-1264 |

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*

# शाश्वत आर्थिक विकास व दारिद्र्य निर्मूलन

**डॉ.प्रमोद बालाजीराव बेरळीकर**
*सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख*
*व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद*
*Email: pbberlikar@gmail.com*

*गोषवारा (Abstract):*

दादाभाई नौरोजी यांनी 'पॉव्हर्टी अँड यू.एन. ब्रिटीश रूल इन इंडिया' या पुस्तकात ब्रिटीशाच्या वसाहतवादी धोरणामुळे भारतातील प्रचंड प्रमाणात असलेली संपत्ती ब्रिटीनमध्ये नेण्यात आली. त्यामुळे भारतातील आर्थिक विकासाचा दर कमी होवून भारताच्या दारिद्र्यात वाढ झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात सन १९७९ पासून 'भारतीय नियोजन मंडळ' राष्ट्रीय नमुना पाहणी, गरीबीचा अंदाज काढत आहे. लोकाचे वय, लिंग आणि रोजच्या कामांचा विचार करून सरासरी कॅलरीचा निकष ठरविला जातो व दारिद्र्याचे प्रमाण व दारिद्र्याची रेषा ठरविली जाते. प्रस्तूत शोधनिबंधात 'भारतातील शाश्वत आर्थिक विकास व दारिद्र्य निर्मूलन' याचा अभ्यास केला आहे.

**Keywords: शाश्वत आर्थिक विकास.दारिद्र्य निर्मूलन**

**प्रस्तावना**

भारतात दोन महत्वाच्या आर्थिक समस्या आहेत. त्यातील एक म्हणजे बेरोजगारी व दुसरी म्हणजे दारिद्र्याची होय. ह्या दोन्ही समस्या कमी करण्यासाठी शाश्वत आर्थिक विकास आवश्यक आहे. सन १९९० च्या जागतिक बॅकेच्या अहवालानुसार अर्थव्यवस्थेत विकास किंवा वृध्दी घडून आल्यास दारिद्र्याच्या समस्येची तीव्रता कमी होवू शकते. भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गेल्या काही दशकामध्ये अर्थव्यवस्थेच्या वृध्दीदरात मोठी वाढ घडून आली. या वाढलेल्या आर्थिक वृध्दीचा परिणाम सकारात्मक घडून आला. आर्थिक विकास आणि दारिद्र्य निर्मूलन या दोहोत सांगड घालणारा दुवा म्हणजे रोजगार होय. जेव्हा आर्थिक विकास होतो. तेव्हा देशात रोजगार निर्मिती होते. त्यातून दारिद्र्य निर्मूलन घडून येते. म्हणजे आर्थिक वृध्दीच्या दरात वाढ झाल्यास रोजगार वाढ व दारिद्र्य निर्मूलन होते.

भारतातील शाश्वत विकास दारिद्र्य निमूर्लन याचा अभ्यास करताना स्वातंत्र्यपूर्वकाळात दादाभाई नौरोजी यांनी भारतातील दारिद्र्याचा अभ्यास केला. दादाभाई नौरोजी यांनी 'पॉव्हर्टी अँड यू. एन. ब्रिटीश रूल इन इंडिया' या पुस्तकात ब्रिटीशाच्या वसाहतवादी धोरणामुळे भारतातील प्रचंड प्रमाणात असलेली संपत्ती ब्रिटीनमध्ये नेण्यात आली. त्यामुळे भारतातील आर्थिक विकासाचा दर कमी होवून भारताच्या दारिद्र्यात वाढ झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात सन १९७९ पासून 'भारतीय नियोजन मंडळ' राष्ट्रीय नमुना पाहणी, गरीबीचा अंदाज काढत आहे. लोकाचे वय, लिंग आणि रोजच्या कामांचा विचार करून सरासरी कॅलरीचा निकष ठरविला जातो व दारिद्र्याचे प्रमाण व दारिद्र्याची रेषा ठरविली जाते. प्रस्तूत शोधनिबंधात 'भारतातील शाश्वत आर्थिक विकास व दारिद्र्य निर्मूलन' याचा अभ्यास केला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :—**

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित केलेली आहे.

१. भारतातील दारिद्रयाच्या प्रमाणाच्या आकडेवारीचा अभ्यास करणे.
२. भारतातील आर्थिक विकास दराचा अभ्यास करणे.
३. भारतातील आर्थिक विकासदरात घडून आलेल्या वाढीचे दारिद्रय रेषेच्या प्रमाणावर झालेले परिणाम अभ्यासणे.

**शोधनिबंधाची गृहितके :—**

१. भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासदरात वाढ होत आहे.
२. भारतीय अर्थव्यवस्थेत दारिद्रय रेषेखालील एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण कमी होत आहेत.

**संशोधन पध्दती :—**

'शाश्वत आर्थिक विकास व दारिद्रय निर्मूलन' हा शोधनिबंध लिहिण्यासाठी द्वितीयक साधन सामुग्री वापरलेली आहे. संदर्भग्रंथ, पुस्तके, त्रैमासिके, मासिके, योजना, अर्थसंवाद अंक आकडेवारीसाठी सरकारी अहवाल याचा आधार घेवून हा शोधनिंबध लिहिला आहे. तसेच प्रस्तुत शोधनिंबधाची मांडणी करण्यासाठी विश्लेषणात्मक पध्दत वापरलेली आहे.

**भारतातील स्थूल (GNP) राष्ट्रीय उत्पनाचा दर :—**

भारतातील स्थूल राष्ट्रीय उत्पन्न दर म्हणजे (GNP) च्या दरात वाढ झाली की देशात रोजगाराच्या दरातसुध्दा वाढ होते व रोजगाराच्या दरात वाढ झाली की दारिद्रयाची समस्या देखील कमी होते व बेरोजगारीच्या समस्या सुध्दा कमी होते. खालील तालिकेत भारतातील स्थूल राष्ट्रीय (GNP) उत्पन्न वाढीचा दर दर्शविलेला आहे.

**तक्ता क्र.१**
**भारतातील देशी उत्पन्न वाढीचा दर**
**(स्थिर किंमतीनुसार)**

| सन | देशी उत्पन्न वाढीचा दर |
|---|---|
| १९५१–५२ | ३.१ (२००४–०५ सिरियल नुसार) |
| १९६०–६१ | ५.५ (२००४–०५ सिरियल नुसार) |
| १९७०–७१ | ५.२ (२००४–०५ सिरियल नुसार) |
| १९९१–९२ | १.० (२००४–०५ सिरियल नुसार) |
| २००१–०२ | ५.० (२००४–०५ सिरियल नुसार) |
| २०१५–१६ | ८.० (२०११–१२ सिरियल नुसार) |
| २०१७–१८ (FAE) | ६.६ (२०११–१२ सिरियल नुसार) |

**संदर्भ** :— Oxford Economic Survey 2017-18Volume- 2
(FAE = First Advance Estimates)

वरील तालिकेत भारतातील देशी उत्पन्न वाढीचा दर स्थिर किंमतीनुसार दाखवला आहे. सन १९५१–५२ या वर्षी देशी उत्पन्न वाढीचा दर ३.१ होता सन १९६०–६१ या वर्षी तो वाढून ५.५ वर आला तर १९७०–७१ मध्ये तो वाढून ५.२ वर आला. सन १९९१–९२ तो कमी झाला केवळ १ एवढा होता. सन २००१–०२ मध्ये तो ५ एवढा वाढला सन २०१५–१६ तो ८ वर आला सन २०१७–१८ मध्ये तो थोडा कमी होवून ६.६ वर आला आहे. एकंदरीत वरील तालिकेवरून हे स्पष्ट होते की स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतील देशील उत्पन्न वाढीचा दर वाढला आहे.

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on "Sustainable Development Goals"

**भारतातील दारिद्रयाचे प्रमाण :—**

भारतातील दारिद्रयाच्या संदर्भात सन १९७३ मध्ये सर्वप्रथम नियोजन आयोगाने दारिद्रय रेषा ठरविण्यासाठी कृतिदलाची नियुक्ती करण्यात आली. अगदी अलीकडे दारिद्रय मोजणीची आणखी नवीन पध्दत शोधून काढण्यासाठी नियोजन आयोगाने सन २००१ मध्ये सुरेश तेंडुलकर समिती स्थापन करण्यात आली. २४ मे २०१६ रोजी नियोजन आयोगाने श्री.सी.रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली एका नव्या तज्ञदलाची नेमणूक करण्यात आली. रंगराजन समितीने दारिद्रय रेषेचा विचार करताना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, कापडखर्च विचारात घेतला आहे. खालील तालिकेत भारतातील दारिद्रयाच्या संदर्भात विश्लेषण केले आहे.

**तक्ता क्रमांक २**

**भारतातील दारिद्रय रेषेचे प्रमाण**

**२.१ नियोजन आयोगाची दारिद्रविषयक आकडेवारी**

| वर्ष | ग्रामीण | शहरी | एकुण |
|---|---|---|---|
| १९७३—७४ | ५६.४ | ४९.० | ५४.९ |
| १९७७—७८ | ५३.१ | ४५.२ | ५१.३ |
| १९८३ | ४५.६ | ४०.८ | ४४.५ |
| १९८७—८८ | ३९.१ | ३८.२ | ३८.९ |
| १९९३—९४ | ३७.३ | ३२.४ | ३६.० |
| १९९९—०० | २७.१ | २३.६ | २६.१ |
| २००४—०५ | २८.३ | २५.७ | २७.५ |

**संदर्भ :— किरण देसले 'स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र' दीपस्तंभ प्रकाशन जळगाव, पाचवी आवृत्ती जुलै २०१५ पृष्ठ क्र.२२**

**२.२ तेंडुलकर समितीची दारिद्रयविषयक आकडेवारी**

| वर्ष | ग्रामीण | शहरी | एकुण |
|---|---|---|---|
| १९९३—९४ | ५०.१ | ३१.८ | ४५.३ |
| २००४—०५ | ४१.८ | २५.७ | ३७.२ |
| २००९—१० | ३३.८ | २०.९ | २९.८ |
| २०११—१२ | २५.७ | १३.७ | २१.९ |

**संदर्भ :— किरण देसले 'स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र' दीपस्तंभ प्रकाशन जळगाव, पाचवी आवृत्ती जुलै २०१५ पृष्ठ क्र.२२**

**२.३ रंगराजन समितीने सुचविलेली आकडेवारी**

| वर्ष | ग्रामीण | शहरी | एकुण |
|---|---|---|---|
| २००९—१० | ३९.६ | ३५.१ | ३८.२ |
| २०११—१२ | ३०.९ | २६.४ | २९.५ |

संदर्भ :— किरण देसले 'स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र' दीपस्तंभ प्रकाशन जळगाव, पाचवी आवृत्ती जुलै २०१५ पृष्ठ क्र.२२

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on "Sustainable Development Goals"

वरील तालिकेवरून हे स्पष्ट होते की, सन १९७३–७४ भारतात दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण एकुण लोकसंख्येच्या प्रमाणाच्या निम्यापेक्षा जास्त ते ५४.९ इतके होते तर सन २०११–१२ तेंडुलकर समितीनुसार भारतातील दारिद्र्याचे प्रमाण २१.९ इतके होते तर रंगराजन समितीच्या आकडेवारीनुसार हे प्रमाण २९.५ इतके होते. पण एवढे मात्र खरे की भारतातील दारिद्र्याच्या प्रमाणात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लक्षणीय घट झालेली आहे.

**भारतातील शाश्वत आर्थिक विकास दर (स्थूल देशी उत्पन्न वाढीचा दर) व दारिद्र्य रेषेचे प्रमाण :—**

स्थूल देशी उत्पन्न वाढीचा दर व दारिद्र्य रेषेचे प्रमाण याचा जवळचा संबंध आहे. आर्थिक विकास रोजगाराला चालना देणारा व रोजगाराला प्रोत्साहन देणारा असला पाहिजे. असा विकास दारिद्र्य निर्मुलनासाठी अधिक उपयुक्त ठरतो. म्हणजे विकास आणि रोजगार यांच्या परस्पर संबंधावर आधारीत विकासकामांना पारंपारिकरित्या भर हा नेहमी वृध्दी दराच्या रोजगार लवचिकतेवर राहिला आहे. म्हणजे वृध्दीदराच्या टक्केवारीत वाढ झाल्यावर रोजगाराचा टक्काही वाढतो. खालील तालिकेत निवडक वर्षातील भारतातील स्थूल देशी उत्पन्न वाढीचा दर व दारिद्र्य रेषेचे प्रमाण दर्शविलेले आहे.

**तक्ता क्रमांक ३**

**भारतातील स्थूल देशी उत्पन्न वाढीचा दर व दारिद्र्य रेषेचे प्रमाण**

| वर्ष | स्थूल देशील उत्पन्न वाढीचा दर (स्थूल किंमतीनुसार) (२००४—०५ नुसार) | दारिद्र्य रेषेचे प्रमाण |
|---|---|---|
| १९७३—७४ | ३.४ | ५४.९ (नियोजन आयोग) |
| १९९९—०० | ८.८ | २६.१ (नियोजन आयोग) |
| २००४—०५ | ७.९ | २७.५ (नियोजन आयोग) |
| २००९—१० | ८.८ | २९.८ (तेंडुलकर समिती) |
| २०११—१२ | ६.९ | २१.९ (तेंडुलकर समिती) |

संदर्भ :— Oxford Volume- 2 Economic Survey 2017-18

वरील तालिकेवरून हे स्पष्ट होते की, सन १९७३—७४ स्थूल देशी उत्पन्न वाढीचा दर ३.४ इतका होता. दारिद्र्याचे प्रमाण ५४.९ होते सन १९९९—०० स्थूल देशी उत्पन्न वाढीचा दर ८.८ होता. तेव्हा दारिद्र्याचे प्रमाण २६.१ होते. तर सन २०११—१२ नुसार स्थूल देशी उत्पन्न वाढीचा दर ६.९ होता. तेव्हा दारिद्र्य रेषेचे प्रमाण २१.९ होते.

**शोधनिबंधाचे निष्कर्ष :—**

१. भारतातील स्थूल देशी उत्पन्न वाढीचा दर व दारिद्र्य रेषेचे प्रमाण याचा जवळचा संबंध आहे.
२. स्थूल देशी उत्पन्न वाढीच्या दराबरोबर दारिद्र्य रेषेचे प्रमाण कमी होताना दिसून येत आहे.
३. रोजगार निर्मिती घडून येण्यासाठी व दारिद्र्य निर्मूलन होण्यासाठी शाश्वत आर्थिक विकासाचा दर वाढता असला पाहिजे.

**संदर्भ सूची :—**

[1] दत्त, महाजन "इंडियन इकॉनॉमी', एस.चंद्र ॲण्ड कंपनी, नवी दिल्ली २०१६, ७२ आवृत्ती
[2] देसाई, भालेराव "भारतीय अर्थव्यवस्था', निराली प्रकाशन शिवाजीनगर पुणे, जून २०१७, पंधरावे आवृत्ती
[3] "सकाळ इयरबुक', सकाळ प्रकाशन, बुधवारपेठ पुणे, प्रथम आवृत्ती जाने.२०१८
[4] ऑक्सफर्ड युनिव्हरसिटी प्रेस, नवी दिल्ली, "इकॉनॉमिक सर्व्हे' २०१७—१८
[5] "योजना' अंक, ऑक्टोबर २०१३, सी.बी.डी.बेलापूर, नवी दिल्ली.
[6] "अर्थसंवाद', मराठी अर्थशास्त्र परिषद, एप्रिल—जून २०१७, खंड ४१, अंक १